**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७५**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०५.०५.२०२३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०२३ रोजी झालेल्या २७५व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सही/- ०५/५/२०२३

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>समर्थ अंगण, बिल्डींग-३A,<br>पु.ल.देशपांडे रोड, मिल्लत नगर,<br>अंधेरी –पश्चिम,<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| प्रशासक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई – ४०० ००१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | सदस्य |

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७५व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक : ०४ मे, २०२३ (गुरुवार)**

**वेळ : सकाळी ११.३० वाजता**

**स्थळ : मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष**
**६वा मजला, मंत्रालय,**
**मुंबई – ४०० ०३२.**

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोज सौनिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. एस. व्हि.आर. श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित:**

श्री. नितीन करीर
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. दिलीप कुमार सिन्हा
संचालक (प्रणाली),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. चंदन शिरसाट
सचिव, कार्यकारी समिती

..२/-

कार्यकारी समितीच्या बैठकीस उपस्थित मा. श्री. मनोज सौनिक, मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

श्री. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे निमंत्रित सदस्य म्हणून स्वागत केले.

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, तत्कालीन मुख्य सचिव यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द अध्यक्ष' व श्री. मनोज सौनिक, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांनी 'पदसिध्द निमंत्रित' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या २७४व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या २७४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३: मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग - २ब मार्गिकेवरील विज पुरवठा आणि ट्रॅक्शन या कामाकरीता (कन्सोटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड) लघुत्तम देकाराला मान्यता मिळणेबाबत.**

**३.१** मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग २ब च्या मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो मार्गिका २ब च्या २ ठिकाणांच्या RSS ची रचना, निर्मिती, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे तसेच 110 KV,33KV आणि 25KV केबलिंग कामासह 25KV ओव्हरहेड कॅटेनरी स्विचिंग स्टेशनसह सिस्टम पूर्ण करणे, तसेच 33KV सहाय्यक वीज वितरण प्रणाली 33/0.415 KVसहाय्यक सब-स्टेशन (ASS) आणि मेनलाईन व डेपोसाठी स्काडा प्रणाली तयार करणे या कामाकरिता रुपये ४४३.३७ कोटीचे (कर वगळता) अंदाजपत्रक सामान्य सल्लागाराने तयार केले आहे आणि प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याने मंजूर केलेले आहे.

३.२ एकेरी निविदा, दोन लिफाफा पद्धतीनुसार आंतरराष्ट्रीय बोली नियमांच्या आधारावर वरील कामांसाठी खुल्या निविदा आमंत्रित करण्यात आल्या आहेत. महा- टेंडर पोर्टलच्या ई-निविदा संकेतस्थळावर दिनांक ०३.११.२०२२ रोजी जारी करण्यात आल्या आहेत. संभाव्य निविदाकारांच्या विनंतीनुसार निविदांची अंतिम मुदत दिनांक १६.१२.२०२२ या मुळ तारखेपासून दिनांक २५.०१.२०२३ पर्यंत वाढविण्यात आली. दिनांक २७.०१.२०२३ रोजी ई-निविदाकारांच्या लिफाफा ‘अ’आणि ‘ब’ (निविदा इसारा किंमत आणि तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले. निविदा प्रक्रियेमध्ये खालील २ (दोन) निविदाकारांनी भाग घेतल्याचे आढळते. खाली उल्लेख केलेल्या ई-निविदांची तांत्रिकी छाननी, प्रकल्पाच्या सामान्य सल्लागारामार्फत करण्यात आली.

१. कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड.

२. मेसर्स. केईसी इंटरनॅशनल लिमिटेड.

३.३ उपरोक्त नमूद २ पैकी दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा हया सक्षम प्राधिकारी व निविदा शिफारस केल्यानुसार व सामान्य सल्लागारांनी दिलेल्या अहवालानुसार सकारात्मक प्रतिसादाच्या असल्याचे निर्दशनास आले. सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिकदृष्टया सक्षम असलेल्या २ (दोन) निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’ आर्थिक प्रस्ताव) दिनांक ०६.०४.२०२३ रोजी उघडण्यात आले व आर्थिक छाननीसाठी सामान्य सल्लागाराकडे दिनांक ०६.०४.२०२३ रोजी पाठविण्यात आले. सामान्य सल्लागाराने आर्थिक छाननी करुन त्यांचा अहवाल दिनांक १०.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केला.

**सुधारित प्रस्ताव किंमत खालीलप्रमाणे आहे :-**

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | INR घटक | USD घटक | EURO घटक | एकूण INR (समतुल्य रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड | रू.३००,११,८१,३५४ | - | ८८,३८,९७६ | ३७८,१६,५०,५६०.२३ |
| २. | मेसर्स केईसी इंटरनॅशनल लिमिटेड | रू.४१४,३६,०८,५७३.५ | १,४५,६८३ | ३,५४,२१७ | ४१८,६९,६५,२२५.४० |

**निविदांचा तुलनात्मक आर्थिक छाननीचा अहवाल**

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | एकूण मूल्यमापन केलेली किंमत (INR) | % अंदाज पत्रकीय किंमतीच्या अधिक/ कमी (Above/Below w.r.t. Estimate) | स्थिती (Position) |
|---|---|---|---|---|
| १. | कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड | रू.३७८,१६,५०,५६०.२३ | १४.७१% कमी | L1 |
| २. | मेसर्स. केईसी इंटरनॅशनल लिमिटेड | रू.४१८,६९,६५,२२५.४० | ५.५६% कमी | L२ |

यानंतर पॅकेज सीए- ४० मध्ये कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड यांचा INR ३००,११,८१,३५४ व EURO ८८,३८,९७६ (समतुल्य INR ३७८,१६,५०,५६०.२३) सर्व कर वगळून रक्कमेचा लघुत्तम देकार (अंदाज पत्रकीय रु.४४३,३६,५९,०१३.४४ किंमती पेक्षा १४.७१% कमी दराचा) आहे. हया कराराच्या किंमतीत INR ३,००,००,००० ही प्रोव्हिजनल रक्कम अतिरिक्त आहे.

विचार-विनिमय केल्यानंतर, निविदा शिफारस समितीने कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेडची लघुत्तम देकार ऑफर व्यवहार्य, वाजवी आहे आणि स्वीकारण्यासाठी शिफारस केली आहे.

**निर्णय: सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्रमांक : १४५३</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सीए-४० साठी **कंन्सोंटियम ऑफ सिमेंन्स लिमिटेड आणि रेल विकास निगम लिमिटेड यांचा INR ३००,११,८१,३५४ व EURO ८८,३८,९७६ (समतुल्य INR ३७८,१६,५०,५६०.२३) (कर वगळता) आणि त्याचबरोबर प्रोव्हिजनल रक्कम म्हणून INR ३,००,००,०००** रकमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिवास करण्यात मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ४ : ठाणे आणि बोरिवली दरम्यान ट्विन ट्युब रोड बोगदा, अप्रोच रोड आणि इतर नागरी कामांची रचना आणि बांधकाम पॅकेज-१ : साखळी क्र.०+०० ते साखळी क्र.५+७५० कि.मी. - बोरिवली बाजूकडील कामाची निविदा स्विकारणेस मान्यता देण्याबाबत.</u>**

४.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की, ठाणे ते बोरीवली हे अंतर पार करण्यासाठी ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते बोरीवली अशा

सहापदरी (३+३ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी मार्गाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्याच्या प्रस्तावास दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या १५०व्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीच्या दिनांक ३० नोव्हेंबर २०१५ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन सदर प्रकल्पासाठी महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

४.२ तसेच सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर अहवाल पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे. एइकॉम एशिया कंपनी लिमिटेड यांची दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत नेमणूक करण्यात आली होती.

४.३ दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४९व्या बैठकीत सदर प्रकल्प म.रा.र.वि. महामंडळाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत मंजूरी दिली आहे. म.रा.र.वि. मंडळाच्या संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर प्रकल्पाची सद्यस्थिती दर्शक टिप्पणी, सल्लागार नेमणुक व सल्लागाराच्या कामाचा वाव, सल्लागाराच्या देयकाबाबतची माहिती, निविदा इत्यादी बाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१ ऑगस्ट, २०२० पासून हस्तांतरीत करण्यात आली आहे असे महानगर आयुक्तांनी सांगितले.

४.४ दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत मे. एइकॉम एशिया कंपनी लिमिटेड, या सल्लागाराने सादर केलेल्या प्राथमिक सुसाध्यता अहवालानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी ईपीसी (EPC) या तत्त्वावर करण्यास मान्यता दिली असुन प्रकल्पाचे बांधकाम एकूण ३ पॅकेजमध्ये करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी २ स्थापत्य कामाचे पॅकेज (Civil works) व तिसरा भाग सुनियोजित वाहतुक प्रणाली, वायुविजन इ. (Intelligent Transport System, Ventilation etc.) या कामाचे पॅकेज आहे. पॅकेज-१: साखळी क्र. ०+०० ते साखळी क्र. ५+७५० बोरीवली - (अंदाजित किंमत ₹७२७३ कोटी) पॅकेज-२: साखळी क्र. ५+७५० ते साखळी क्र. ११ + ८४ ठाणे (अंदाजित किंमत ₹७४६१ कोटी) आणि पॅकेज-३: सिस्टमची

खरेदी, स्थापना आणि कार्यान्वित इ. (अंदाजित किंमत ₹५३० कोटी) आहे. तसेच प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) (अंदाजित किंमत ₹२५४.४ कोटी) यांच्या नेमणुकीकरीता निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी नमुद केले.

४.५ केंद्रीय पर्यावरण व वन विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिसुचनेनुसार पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पर्यावरण व वन विभागाकडे सादर केला होता. दिनांक १५.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर प्रकल्पासाठी पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे असे महानगर आयुक्तांनी समितीस सांगितले.

४.६ महानगर आयुक्तांनी प्रकल्पाची सद्य:स्थितीची माहिती देतांना असे सांगितले की, नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफची (NBWL) परवानगी नियमावलीनुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळविणेसाठी प्रस्ताव मंजुरीकरीता दिनांक ०६ जानेवारी, २०२१ रोजी ऑनलाईन सादर करण्यात आलेला आहे. सदर परवानगी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच वन विभागाची परवानगी नियमावलीनुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविणेसाठी सुधारित अंमलबजावणी प्राधिकरणात बदल (Change in user agency) करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी दि.२३ नोव्हेंबर, २०२० रोजी सादर करण्यात आला आहे. ६०.०३५९ हेक्टर क्षेत्रफळाच्या प्रकल्पातील नुकसान भरपाई वनीकरण (CA) जमीन (गट नं. ५९५) ही उमरावती, फुलंब्री, औरंगाबाद दिनांक ०७ मे, २०१९ रोजी निश्चित केली असुन पर्यायी वनीकरणासाठी सुधारित भरपाई वनीकरण योजना १० वर्षाकरीता दिनांक १३.०८.२०२० रोजी प्रमुख वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

४.७ महानगर आयुक्तांनी प्रकल्पाच्या वावाबाबत माहिती देतांना असे सांगितले की, पॅकेज-१: साखळी क्र. ०+०० ते साखळी क्र. ५+७५० कि.मी. बोरीवली बाजूकडील कामाची ई- निविदा प्रक्रीया सुरू करण्यात आली. सदर प्रकल्पासाठी ७ सदस्य असलेली निविदा छाननी समिती गठीत करण्यात आली.

४.८ महानगर आयुक्तांनी प्रस्तावाविषयी माहिती देताना असे सांगितले की, पॅकेज-१ करीता निविदा सुचना हिंदुस्तान टाईम्स व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. याबाबतची कागदपत्रे तसेच ई-निविदा सुचना महाटेंडर पोटर्लवर उपलब्ध करुन

देण्यात आली होती. सदर कामाची दि. १०/०३/२०२३ रोजी निविदा पुर्व बैठक घेण्यात आली याबाबतच्या निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्दांचा खुलासा व सीएसडी ई-टेंडर पोर्टवर प्रसिध्द करण्यात आल्या सदर बैठकीस निविदाकारांनी चांगला प्रतिसाद दिलेला दिसून येतो. निविदा सादर करण्याचा अंतिम निविदा दिनांक ३ एप्रिल, २०२३ पर्यंत होता. तथापि, निविदाकारांच्या विनंतीनुसार निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक दि. ६ एप्रिल, २०२३ करण्यात आला. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पॅकेज-१ करीता एकूण ०२ निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत. प्राप्त निविदांच्या तांत्रिक बाबींची कागदपत्रे उपस्थित निविदाकारांच्या समोर दि. १० एप्रिल, २०२३ रोजी समक्ष उघडण्यात आल्या.

४.९ महानगर आयुक्तांनी पुढे असे नमुद केले की, निविदा छाननी समिती (Tender Review Committee) समोर प्राप्त निविदांची पडताळणी नेमण्यात आलेल्या सल्लागाराकडून खालील टप्प्यांमध्ये करण्यात आली.

टप्पा-१: प्राथमिक तांत्रिक निविदा छाननी
टप्पा-२: तांत्रिक छाननी
टप्पा-३: आर्थिक देकार प्रकल्पांची छाननी

४.१० संबंधित सल्लागाराकडून तांत्रिक मूल्यमापन अहवाल दि.१२ एप्रिल,२०२३ रोजी प्राप्त झाला. निविदा छाननी समितीची पहिली बैठक दिनांक १२.०४.२०२३ रोजी घेण्यात आली. निविदेतील परिच्छेद क्र.३.१.४ नुसार दोन्ही निविदाकारांना कागदपत्रांची कमतरता/ स्पष्टीकरणाबाबत पत्र पाठविण्याचे ठरले. निविदेच्या परिच्छेद क्र.२.२.२.२ (i) आणि क्लॉज २.२.२.२ (iii) (b) मध्ये नमूद केलेल्या तांत्रिक क्षमतेबाबत अर्हता पुर्ततेसाठी स्पष्टीकरण मागविण्याचे ठरले. सदर बाबतचे निविदाकारांचे स्पष्टीकरण दि.२१.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले. सदर स्प्ष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर संबंधित सल्लागाराने त्यांची छाननी करुन प्राधिकरणास दि. २४.०४.२०२३ रोजी अहवाल सादर केला. तद्नंतर दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी निविदा छाननी समितीची दुसरी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत संबंधित सल्लागाराने सर्व उपस्थित सदस्यांसमोर सादरीकरण केल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. तसेच सल्लागारांकडून प्राप्त अहवालाबाबत समितीस अवगत करण्यात आले. M/s. Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) व M/s. L&T या निविदाकारांनी उपस्थित मुद्दयांमधील तांत्रिक अहवालाबाबत अतिरिक्त कागदपत्रे ई-मेलव्दारे व महाटेंडरच्या पोर्टलवर सादर केली. सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता M/s. L&T यांनी दि. २१.०४.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे की, त्यांची तांत्रिक अर्हता पॅकेज-२ साठी ग्राह्य

धरण्यात यावी. M/s.L&T यांनी प्राधिकरणाने उपस्थित केलेल्या क्वेरी क्र. ३ ला दिलेल्या प्रतिसादात ही बाब नमूद केलेली असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले. तद्नंतर पॅकेज-१ मध्ये M/s. Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) या निविदाकाराचा आर्थिक देकार उघडण्याचे ठरले.

४.११ सदर बैठकीचे इतिवृत्त मान्यतेनंतर दि.२५.०४.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता पॅकेज-१ चे आर्थिक देकार संबधित उपस्थित अधिकारी व निविदाकरांच्या समक्ष उघडण्यात आले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने गठित केलेल्या निविदा छाननी समितीची (Tender Review Committee) तिसरी बैठक दि. २५.०४.२०२३ रोजी दुपारी २.०० वा आयोजित करण्यात आली. सल्लागाराने निविदेतील निकषांच्या आधारे निविदाकारांच्या आर्थिक देकारांची छाननी करुन त्याबाबतचा अहवाल सादर केला. आर्थिक देकारांच्या छाननीअंती पॅकेज- १ च्या निविदाकाराचे आर्थिक देकार ( Bid Prices) खालीलप्रमाणे आहे:

| Sr no | Name of Bidder | Estimated cost + provisional sum excluding GST | Quoted Bid Prices in INR including Provisional Sum excluding GST | Position |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s Megha Engineering & Infrastructures Ltd ( MEIL) | ₹.6182.00 Cr | ₹. 6326.00 Cr | L1 |

M/s Megha Engineering & Infrastructures Ltd ( MEIL) यांचे पॅकेज-१ करीता आर्थिक देकार हे लघुत्तम असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले. तसेच निविदा छाननी समितीने आर्थिक देकार कमी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत केले.

४.१२ महानगर आयुक्तांनी कंत्राटीय सष्टीकरण माहिती देताना असे सांगितले की, दिनांक २५.०४.२०२३ रोजी M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांनी पत्र क्रमांक MEIL/TENDERS/MMRDA/TWIN.TUNNEL/PAC१/ २०२३-२४/०५. DT. २५.०४.२०२३ अन्वये आर्थिक देकार ₹०.०६५% ने कमी केला आहे. सदर पत्रानुसार सल्लागाराने अहवाल सादर केला असुन तद्नंतर छाननी समितीची ४ थी बैठक दि. २५.०४.२०२३ रोजी सायकांळी ७.१५ वाजता आयोजित करण्यात आली व अहवाल सादर करण्यात आला. M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांनी दिलेला सुधारीत आर्थिक देकार खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

| Sr. No. | Name of Bidder | Estimated cost + provisional sum excluding GST | Quoted Bid Prices in INR including Provisional Sum excluding GST | Discounted Bid Prices in INR including Provisional Sum and excluding GST | Remark | Position |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s Megha Engineering & Infrastructures Ltd ( MEIL) | ₹.6182.00 Cr | ₹. 6326.00 Cr | ₹. 6178.00 Cr | Discount of ₹.148.00 Cr | L1 |

समितीच्या चौथ्या बैठकीत या सुधारीत देकाराबाबत चर्चा करण्यात आली. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग (केंद्रीय दक्षता आयोगाच्या वेबसाइटवर प्रकाशित केलेल्या) जून २०२२, रोजी जारी केलेल्या बांधकामाच्या खरेदीसाठीच्या नियमावलीच्या प्रकरण क्र.५च्या परिच्छेद ५.६.७(पृष्ठ क्र.८०) मध्ये नमूद केल्याप्रमाणे एका निविदाकारासाठी आवश्यक तिन्ही अटींची पूर्तता होत असल्याचे निदर्शनास आले. M/s. Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचा लघुत्तम देकार स्विकृत करण्यासाठी शिफारस करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले.

४.१३ M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) ची ₹ ६१७८ कोटी इतक्या रकमेची प्राप्त निविदा स्विकृत करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे सदरची बोली प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (₹ ६१८२ कोटी) ०.०६५% कमी आहे. त्यामुळे प्राप्त देकार हा विस्तृत प्रसिद्धी नंतर प्राप्त झाला असुन तो व्यवहार्य आढळून येतो. तसेच निविदेत तांत्रिक व आर्थिक तरतुदी कंत्राटदारांचा पुरेसा प्रतिसाद मिळेल अशा ठेवण्यात आल्या होत्या. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग, केंद्रीय दक्षता आयोगाच्या वेबसाइटवर प्रकाशित केलेल्या जून, २०२२च्या प्रकरण क्र.५ मध्ये नमुद केलेल्या बांधकामांच्या खरेदीसाठीच्या नियमावलीच्या परिच्छेद ५.६.७ मध्ये (पृष्ठ क्र.८०) नमूद तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आहे. त्यामुळे M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांची न्युनतम ₹६१७८ कोटी देकार स्विकृत करण्यास मान्यता देण्यासाठी महानगर आयुक्त यांनी शिफारस केली.

४.१४ दरम्यानच्या काळात M/s. L&T या निविदाकाराच्या वकिलाचे पत्र क्र. २५६८ दि. २६.०४.२०२३ हे दि. २७.०४.२०२३ रोजी प्राधिकरणास प्राप्त झाले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी M/s. L&T यांनी दि. ०६.०४.२०२३ रोजी सादर केलेला आर्थिक देकार पात्र समजण्यात यावा तसेच माझ्या अशीलाची बोली नाकारण्याचा निर्णय मागे घ्यावा व पॅकेज-१ करीता माझ्या अशीलाची M/s. L&T यांची आर्थिक बोली उघडण्यात यावी. M/s. L&T यांचे वकील Cyril Amarchand Mangaldas यांचे पत्र क्र. २५७० दि. २७.०४.२०२३ अन्वये याचिका क्र. BHC WRIT PETITION (L) No. 12017 of 2023 दाखल केली असुन सदर याचिकेची सुनावणी दि.०२.०५.२०२३ व दि.०३.०५.२०२३ रोजी झाली, त्यामध्ये M/s. L&T यांनी त्यांची बाजु मांडली. मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत न्यायालयात सादर

केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत मा. उच्च न्यायालयात सादर केली आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिली नसल्याची बाब कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणण्यात आली. या बाबीची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

४.१५ सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीमध्ये साधक बाधक चर्चा करून प्रकरणाची योग्यता लक्षात घेता सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४५४ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ठाणे आणि बोरिवली दरम्यान ट्विन ट्यूब रोड बोगदा, अप्रोच रोड आणि इतर नागरी कामांची रचना आणि बांधकामच्या पॅकेज-१ करीता M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचा ₹. ६१७८ कोटी रक्कमेचा देकार (Including Provisional Sum but excluding GST) स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. ५:</u> <u>ठाणे आणि बोरिवली दरम्यान ट्विन ट्युब रोड बोगदा, अप्रोच रोड आणि इतर नागरी कामांची रचना आणि बांधकाम पॅकेज-२ : साखळी क्र.५+७५० ते साखळी क्र.११+८४ कि.मी. — ठाणे बाजूकडील कामाची निविदा स्विकारणेस मान्यता देण्याबाबत.</u>**

५.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की, ठाणे ते बोरीवली हे अंतर पार करण्यासाठी ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते बोरीवली अशा सहापदरी (३+३ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी मार्गाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्याच्या प्रस्तावास दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या १५० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीच्या दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आली होती.

५.२ तसेच सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर अहवाल पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले होते. सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे.एइकॉम एशिया कंपनी लिमिटेड यांची दिनांक ११.०४.२०१६ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत नेमणूक करण्यात आली होती.

५.३ दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४९ व्या बैठकीत सदर प्रकल्प म.रा.र.वि. महामंडळाकडुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत मंजूरी दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाच्या संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर प्रकल्पाची सद्य:स्थिती दर्शक टिप्पणी, सल्लागार नेमणुक व सल्लागाराच्या कामाचा वाव, सल्लागाराच्या देयकाबाबतची माहिती, निविदा इत्यादी बाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१ ऑगस्ट, २०२० पासून हस्तांतरीत करण्यात आली असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

५.४ महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची माहिती देताना असे सांगितले की, दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत मे. एइकॉम एशिया कंपनी लिमिटेड या सल्लागाराने सादर केलेल्या प्राथमिक सुसाध्यता अहवालानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी ईपीसी (EPC) या तत्त्वावर करण्यास मान्यता दिली असुन प्रकल्पाचे बांधकाम एकूण ३ पॅकेजमध्ये करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी २ स्थापत्य कामाचे पॅकेज (Civil works) व तिसरा भाग सुनियोजित वाहतुक प्रणाली, वायुविजन इ. (Intelligent Transport System, Ventilation etc.) या कामाचे पॅकेज आहे. पॅकेज-१: साखळी क्र. ०+०० ते साखळी क्र ५+७५० बोरीवली - (अंदाजित किंमत - ₹७२७३ कोटी) पॅकेज-२: साखळी क्र ५+७५० ते साखळी क्र ११ + ८४ ठाणे (अंदाजित किंमत ₹७४६१ कोटी) आणि पॅकेज-३ : सिस्टमची खरेदी, स्थापना आणि

कार्यान्वित इ. (अंदाजित किंमत ₹५३० कोटी) आहे. तसेच प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) (अंदाजित किंमत ₹२५४.४ कोटी) यांच्या नेमणुकीकरीता निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात आली.

५.५ केंद्रीय पर्यावरण व वन विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिसुचनेनुसार पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पर्यावरण व वन विभागाकडे सादर केला होता. दिनांक १५.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर प्रकल्पासाठी पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे कळविले असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीस सांगितले.

५.६ नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफची (NBWL) परवानगी नियमावलीनुसार ‘ना हरकत प्रमाणपत्र’ मिळविणेसाठी प्रस्ताव मंजुरीकरीता दिनांक ०६ जानेवारी, २०२१ रोजी ऑनलाईन सादर करण्यात आलेला आहे. सदर परवानगी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच वन विभागाची परवानगी नियमावलीनुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविणेसाठी सुधारित अंमलबजावणी प्राधिकरणात बदल (Change in user agency) करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी दि.२३ नोव्हेंबर, २०२० रोजी सादर करण्यात आला आहे. ६०.०३५९ हेक्टर क्षेत्रफळाच्या प्रकल्पातील नुकसान भरपाई वनीकरण (CA) जमीन (गट नं. ५९५) ही उमरावती, फुलंब्री, औरंगाबाद दिनांक ०७ मे, २०१९ रोजी निश्चित केली असुन पर्यायी वनीकरणासाठी सुधारित भरपाई वनीकरण योजना १० वर्षाकरीता दिनांक १३.०८.२०२० रोजी प्रमुख वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

५.७ महानगर आयुक्तांनी प्रकल्पाच्या वावाबद्दल माहिती देतांना असे सांगितले की, पॅकेज-२: साखळी क्र. ५+७५० ते साखळी क्र. ११+८४ कि.मी - ठाणे बाजूकडील कामाची ई- निविदा प्रक्रीया सुरू करण्यात आली. सदर प्रकल्पासाठी महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने ७ सदस्य असलेली निविदा छाननी समिती गठीत करण्यात आली.

५.८ महानगर आयुक्तांनी प्रस्तावाविषयी माहिती देताना असे सांगितले की, पॅकेज-२ करीता निविदा सुचना हिंदुस्तान टाईम्स व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा सुचना महाटेंडर पोटर्लवर उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर कामाची दि.१०/०३/२०२३ रोजी निविदा पुर्व बैठक महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याबाबतच्या निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा

व सीएसडी ई- टेंडर पोर्टवर प्रसिध्द करण्यात आल्या. सदर बैठकीस निविदाकारांनी चांगला प्रतिसाद दिलेला दिसून येतो. निविदा सादर करण्याचा अंतिम निविदा दिनांक ३ एप्रिल, २०२३ पर्यंत होता. तथापि, निविदाकारांच्या विनंतीनुसार निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक ६ एप्रिल, २०२३ करण्यात आला. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पॅकेज-२ करीता एकूण ०२ निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत. प्राप्त निविदांच्या तांत्रिक बाबींची कागदपत्रे उपस्थित निविदाकारांच्या समोर दि. १० एप्रिल, २०२३ रोजी समक्ष उघडण्यात आल्या.

५.९ महानगर आयुक्तांनी पुढे असे नमुद केले की, निविदा छाननी समिती ( Tender Review Committee) समोर प्राप्त निविदांची पडताळणी नेमण्यात आलेल्या सल्लागारकडून खालील टप्प्यांमध्ये करण्यात आली.

टप्पा-१: प्राथमिक तांत्रिक निविदा छाननी

टप्पा-२: तांत्रिक छाननी

टप्पा-३: आर्थिक देकार प्रकल्पांची छाननी

५.१० संबंधित सल्लागाराकडून तांत्रिक मूल्यमापन अहवाल दि.१२ एप्रिल,२०२३ रोजी प्राप्त झाला. निविदा छाननी समितीची पहिली बैठक दिनांक १२/०४/२०२३ रोजी घेण्यात आली. निविदेतील परिच्छेद क्र.३.१.४ नुसार दोन्ही निविदाकारांना कागदपत्रांची कमतरता / स्पष्टीकरणाबाबत पत्र पाठविण्याचे ठरले. निविदेच्या परिच्छेद क्र.२.२.२.२ (i) आणि क्लॉज २.२.२.२(iii)(b) मध्ये नमूद केलेल्या तांत्रिक क्षमतेबाबत अर्हता पुर्ततेसाठी स्पष्टीकरण मागविण्याचे ठरले.

५.११ सदर बाबतचे निविदाकारांचे स्पष्टीकरण दि.२१.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले. सदर स्प्ष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर संबंधित सल्लागाराने त्यांची छाननी करुन प्राधिकरणास दि. २४.०४.२०२३ रोजी अहवाल सादर केला. तद्नंतर, दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी निविदा छाननी समितीची दुसरी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत संबंधित सल्लागाराने सर्व उपस्थित सदस्यांसमोर सादरीकरण केल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. तसेच सल्लागारांकडून प्राप्त अहवालाबाबत समितीस अवगत करण्यात आले. M/s. Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) व M/s. L&T या निविदाकारांनी उपस्थित मुद्दयांमधील तांत्रिक अहवालाबाबत अतिरिक्त कागदपत्रे ई-मेलव्दारे व महाटेंडरच्या पोर्टलवर सादर केली. सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता M/s. L&T यांनी कळविले की,

त्यांची तांत्रिक अर्हता पॅकेज-२ साठी ग्राह्य धरण्यात यावी असे नमूद केलेली असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले. म्हणून पॅकेज- २ मध्ये M/s. Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) व M/s. L&T या निविदाकारांचे आर्थिक देकार उघडण्याचे ठरले.

५.१२ सदर बैठकीचे इतिवृत्त मान्यतेनंतर दि.२५.०४.२०२३ रोजी आर्थिक देकार सकाळी १०.०० वा. उघडण्यात येईल अशा आशयाचा ई-मेल दि. २४.०४.२०२३ रोजी पाठविण्यात आला. दि. २५.०४.२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता पॅकेज-२ चे आर्थिक देकार संबधित उपस्थित अधिकारी व निविदाकरांच्या समक्ष उघडण्यात आले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने गठित केलेल्या निविदा छाननी समितीची (Tender Review Committee) तिसरी बैठक दि. २५.०४.२०२३ रोजी दुपारी २.३० वा. आयोजित करण्यात आली. सल्लागाराने निविदेतील निकषांच्या आधारे निविदाकारांच्या आर्थिक देकारांची छाननी करुन त्याबाबतचा अहवाल सादर केला. आर्थिक देकारांच्या छाननीअंती पॅकेज- २ च्या निविदाकाराचे आर्थिक देकार (Bid Prices) खालीलप्रमाणे आहे:

| Sr no | Name of Bidder | **Estimated cost Including provision sum and excluding GST** | **Corrected Bid Prices in INR including Provisional Sum & excluding GST** | **Position** | **Remark** |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/s L&T | ₹ ६३४१.०० Cr | ₹. ६६२५.०० Cr | L२ | |
| २ | M/s Megha Engineering & Infrastructures Ltd ( MEIL) | | ₹.५८७९.०० Cr | L१ | ७.२९% below |

M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचे पॅकेज-२ करीता आर्थिक देकार हे लघुत्तम असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले. तसेच निविदा छाननी समितीने आर्थिक देकार कमी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत केले.

५.१३ महानगर आयुक्तांनी कंत्राटीय सष्टीकरण माहिती देताना असे सांगितले की, दिनांक २५.०४.२०२३ रोजी M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांनी पत्र क्रमांकMEIL/TENDERS/MMRDA/TWINTUNNEL/PKG२/ २०२३-२४/०६/DT २५.०४.२०२३ अन्वये आर्थिक देकार ₹५८७९.०० कोटी (including provisional sum) वाजवी आहे त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही असे नमुद केले आहे. सदर पत्रानुसार सल्लागाराने अहवाल सादर केला असुन तद्नंतर छाननी समितीची ४ थी बैठक दि. २५.०४.२०२३ रोजी सायकांळी ७.३० वाजता घेण्याचे ठरले. प्राप्त निविदाकारांचे

पत्र व सल्लागाराचा अहवाल निविदा छाननी समितीस दि. २५.०४.२०२३ रोजी सादर करण्यात आले. सदर बैठकीत निविदेतील परिच्छेद क्र.१.७.१ खंड क्र.७ मधील मुद्दा क्र. ३ अन्वये निविदाकाराची कामासाठीची बोली (GST वगळून) व Provisional sum यांची एकत्रित रक्कम ही निविदा छाननीसाठी ग्राह्य धरावी असे नमुद केले आहे. त्यानुसार M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचा लघुत्तम देकार स्विकृत करण्याची शिफारस निविदा छाननी समितीने केली आहे. M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) ची ₹ ५८७९ कोटी इतक्या रकमेची प्राप्त निविदा स्विकृत करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे सदरची बोली प्रकल्पाच्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (₹ ६३४१ कोटी) ७.२९% कमी आहे. त्यामुळे M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांची न्युनतम ₹५८७९ कोटी देकार स्विकृत करण्यात मान्यता देण्यासाठी शिफारस करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणले.

५.१४ दरम्यानच्या काळात M/s. L&T या निविदाकाराकडून त्यांचे पत्र क्र. LNT/HCIIC/ HNT/MMRDA/T-BP२/२०२३/०६, दि. २५.०४.२०२३ हे दि. २६.०४.२०२३ रोजी प्राधिकरणास प्राप्त झाले आहे. तसेच पत्र क्र.LNT/HCIIC/HNT/MMRDA/T-B-P२/२०२३/०७, दि.२६.०४.२०२३ हे दि.२७.०४.२०२३ रोजी प्राधिकरणास प्राप्त झाले आहे. दरम्यानच्या काळात M/s. L&T या निविदाकाराचे वकील Cyril Amarchand Mangaldas यांचे पत्र क्र. २१७१ दि. २७.०४.२०२३ अन्वये याचिका क्र. BHC WRIT PETITION (L) No. १२०२३ of २०२३ दाखल केली आहे, सदर याचिकेची सुनावणी दि. ०२.०५.२०२३ रोजी आहे असे नमुद करण्यात आले आहे. या याचिकेसंबंधीत आवश्यक बाबींची पुर्तता प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. सदर सुनावणी दि. ०३.०५.२०२३ रोजी मा. उच्च न्यायालयात झाली, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत मा. उच्च न्यायालयात सादर केली आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिली नसल्याची बाब महानगर आयुक्तांनी कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणली. या बाबीची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

५.१५ सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीमध्ये साधक बाधक चर्चा करुन

प्रकरणाची योग्यता लक्षात घेता सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

**<u>ठराव क्र.१४५५:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ठाणे आणि बोरिवली दरम्यान ट्विन ट्यूब रोड बोगदा, अप्रोच रोड आणि इतर नागरी कामांची रचना आणि बांधकामच्या पॅकेज-२ करीता M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचा ₹. ५८७९ कोटी रक्कमेचा देकार (Including Provisional Sum but excluding GST) स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*****